महाराष्ट्र शासन
वित्तीय सल्लागार व उप सचिव,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
जी.टी.हॉस्पिटल कॉम्प्लेक्स इमारत, ८ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी क्र-०२२ २२६१६८२३/६९४१ Email ID :fadsmumbai.mhpds@gov.in

---

क्र.विसउस/नोंदणी/२०२३-२४/वाहन निर्लेखन/न.क्र.११/जा. 2368 दिनांक:- /१०/२०२३

## निर्लेखित केलेल्या वाहनाची लिलावाने विक्री सूचना.

वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयातील निर्लेखित केलेल्या शासकीय वाहन टाटा इंडिगो CS क्र.MH०१-ZA-०३८३ या वाहनाची लिलावद्वारे विक्री करावयाची आहे. ज्या संस्थांना/व्यक्तींना सदर निर्लेखित वाहन खरेदी करावयाचे आहे, त्यांना सदर वाहन दि.२५.१०.२०२३ ते दि.०३.११.२०२३ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत पाहता येईल.

लिलाव विक्रीची सुचना, अटी व शर्ती mahafood.gov.in या संकेतस्थळावर तसेच वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, जी.टी.हॉस्पिटल कॉम्प्लेक्स इमारत, ८ वा मजला,लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१ येथील कार्यालयाच्या सुचना फलकावर लावण्यात आल्या आहेत. ज्यांना लिलावाच्या अटी व शर्ती मंजूर असतील अशा संस्था/व्यक्तींनी लिलावात सहभागी व्हावे. लिलावासाठी पाठवावयाचे आपले दर बंद पाकिटातून कार्यालयाच्या उपरोक्त पत्त्यावर दि.०३.११.२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठवावे. सदर बंद लिफाफे दि.०४.११.२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्या दालनात उघडण्यात येतील. ज्या व्यक्तीचे/संस्थांचे दर जास्त असतील अशा संस्थेस/व्यक्तीस वाहनाची विक्री करण्यात येईल.

(सारिका ननवरे)
उपसंचालक

सहपत्र:- लिलावाच्या अटी व शर्ती .

...\natade\वाहन निर्लेखन MH-01-ZA-0383 - नस्ती क्र 21.docx

Scanned with OKEN Scanner

# वाहन लिलाव सुचनेच्या अटी व शर्ती

शासकीय वाहन टाटा इंडिगो CS क्र.MH०१-ZA-०३८३ वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, जी.टी.हॉस्पिटल कॉम्प्लेक्स इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१ येथील आवारात ठेवण्यात आले आहे. त्यानुसार दि.२५.१०.२०२३ ते ०३.११.२०२३ या कालावधीत दररोज सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वाहनाची प्रत्यक्ष पाहणी करुन जास्तीत जास्त दर नमूद करावेत. वाहनाची सदयस्थिती पाहिल्याशिवाय लिलावात भाग घेऊ नये अन्यथा नंतर कोणतीही तक्रार अथवा सबब स्विकारली जाणार नाही.

१. लिलावाद्वारे सदर दरपत्रके वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, जी.टी.हॉस्पिटल कॉम्प्लेक्स इमारत, ८ वा मजला,लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१ येथे स्विकारण्याचा कालावधी दि.२५.१०.२०२३ ते दि.०३.११.२०२३ पर्यंत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० असा राहील.

२. लिलाव प्रक्रियेत भाग घेणारी संस्था मुंबई महानगर विकासा प्राधिकरण (MMRDA) परिक्षेत्रातील असणे आवश्यक आहे. MMRDA परिक्षेत्राबाहेरील संस्थेने वाहन लिलाव प्रक्रियेत भाग घेतल्यास त्यांचे दरपत्रक स्विकृत केले जाणार नाही.

३. लिलावाने विक्री करावयाचे वाहन जेथे आहे व ज्या अवस्थेमध्ये आहे त्या अवस्थेमध्ये ताब्यात घ्यावे लागेल. वाहनाच्या अवस्थेमध्ये कोणताही बदल वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाकडून केला जाणार नाही.

४. ज्या संस्थेची लिलाव बोली इतर संस्थांपेक्षा जास्त असेल अशाच संस्थेस वाहनाची रोखीने (रु.२००० च्या नोटा स्विकारल्या जाणार नाहीत) एकाच वेळी (one time payment full and final settlement) करणे सक्तीचे आहे. ज्या संस्थेस वाहन विक्री करण्याचे ठरविले आहे, त्या संस्थेने वाहन ताब्यात घेण्यापूर्वी वाहनाची संपुर्ण रक्कम या कार्यालयास जमा करणे अनिवार्य आहे.

५. विक्री केलेले वाहन कार्यालयाच्या आवारातून नेण्याची कार्यवाही दरम्यानचा संपुर्ण व सर्व प्रकारचा खर्च ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल. त्याबाबत कोणताही खर्च कार्यालयाकडून केला जाणार नाही.

६. ठेका मंजुर केलेल्या संस्थेने वाहन उचलण्याचे काम कार्यालयीन वेळेत म्हणजे सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० पर्यंत साप्ताहिक /सार्वजनिक सुट्टया वगळून कामकाजाच्या दिवशी करावयाचे आहे.

७. लिलावाने विक्री केलेले वाहन कंत्राटदाराने ताब्यात घेतल्यानंतर कार्यालयाच्या आवाराबाहेर नेताना कार्यालयाच्या इमारतीचे/आवारातील कोणत्याही साहित्याचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदाराकडून (on the spot) त्याच ठिकाणी रोखीच्या स्वरुपात वसुल करण्यात येईल व याबाबत ठेकेदारास बाजू मांडण्याची कोणतीही संधी दिली जाणार नाही.

८. लिलाव बोली कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा तसेच लिलावाची कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा अथवा त्यामध्ये कोणताही फेरबदल/सूचना करण्याचा संपुर्ण अधिकार वित्तीय सल्लागार व उपसचिव यांनी राखून ठेवला आहे. तसेच याबाबत कोणतीही कारणमिमांसा केली जाणार नाही.

९. लिलावाच्या कार्यवाही दरम्यान एखाद्या संस्थेने/व्यक्तिने हस्तक्षेप केल्यास शासकीय कामकाजात अडथळा आणल्यामुळे त्यांचे विरुध्द भा.दं.वि. च्या कलमाखाली नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात येईल.

१०. ज्या संस्थेची/व्यक्तीची लिलाव विक्रीची उच्चतम बोली स्विकारण्यात येईल त्या संस्थेने/व्यक्तीने लिलावाच्या रकमेचा ४८ तासात रोखीने भरणा केल्यानंतर पुढील ७२ तासांच्या आत विक्री केलेले वाहन स्वखर्चाने वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाच्या आवारातुन उचलून नेणे आवश्यक आहे.

११. वाहन लिलावाकरीता दरपत्रक सादर करावयाचा अंतिम दि.०३ .११.२०२३ (सायंकाळी ५.०० ) असा आहे.

वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाचे जुने व निर्लेखित झालेले वाहन याचा लिलाव विक्रीबाबत लिलाव सुचनेमध्ये नमूद केलेल्या वरील सर्व अटी /शर्ती मला पुर्णपणे मान्य आहेत. तसेच सदर अटी आणि शर्तीबाबत माझी कोणतीही तक्रार किंवा हरकत असणार नाही.

नाव-----------------------------------------स्वाक्षरी व संस्थेचा रबरी शिक्का-----------------------------------



Scanned with OKEN Scanner